रासनिप्रा

# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे –४११००१.
फोन नं. - (०२०) २६०५०६४१
मेल आयडी - sceapune@gmail.com वेब साईट - scea.maharashtra.gov.in

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/ कृ.उ.बा.स./निवडणूक प्रक्रिया सुरू करणे / १९१८ /२०२३. दिनांक: ०९/०३/२०२३.

निवडणूक प्राधान्य

**वाचले** :- १. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुद

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) अधिनियम २०२०, दिनांक १४.३.२०२०

३. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) (पहिली सुधारणा) नियम २०२०, दिनांक १६.४.२०२१

४. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ११ (१) मधील तरतुद

५. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. १४५३/सन २०२१, दिनांक २९.०४.२०२१

**प्रस्तावना** :-

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुदीनुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांचे अधिक्षण, निर्देशन व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपवलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचावे क्रमांक ५ च्या आदेशानुसार जिल्हयांतील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका घेण्याकरीता करीता संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना 'जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.)' म्हणून घोषित केलेले आहेत. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ११ (१) मधील तरतुदीनुसार कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकीकरीता निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत. आणि,

ज्या अर्थी, कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकीकरीता बाजार क्षेत्रात कार्य करणाऱ्या प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्था, बहुउद्देशीय सहकारी संस्था (ज्या त्यांच्या सभासदांना पीक कर्ज संवितरीत करतात अशा संस्था) व ग्रामपंचायत यांचे सदस्य मतदार असून बाजार क्षेत्रातील पात्रता धारण करणारे कोणतेही शेतकरी कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकीत उभे राहणार आहेत. परिणामी कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूक प्रक्रिया हया चुरशीच्या, अटातटीच्या व संवेदनशील स्वरुपाच्या होत असतात. त्यामुळे सदर निवडणूक प्रक्रिया मोकळया, पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पार पाडणे आवश्यक असल्याने बाजार समित्यांच्या निवडणूकांकरीता निवडणूक निर्णय

अधिकारी व  सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जबाबदार अधिकाऱ्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) मधील तरतुदीनुसार निवडणूका सुरळीतपणे व मोकळया वातावरणात पार पाडण्यासाठी कायदा, नियम या मधील तरतुदीशी सुसंगत आदेश पारीत करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत. आणि,

त्या अर्थी, प्राधिकरण राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांकरीता निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्तीबाबत खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**-:: आदेश ::-**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ), महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) व नियम ११ (१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार प्राधिकरण कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांकरीता शिफारस करावयाच्या निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्तीबाबत खालीलप्रमाणे निकष निश्चित करीत आहे.

१. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकीकरीता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून राज्य शासनाचे वर्ग १ किंवा वर्ग २ संवर्गातील अधिकाऱ्याची शिफारस करावी.

२. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकीकरीता सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून राज्य शासनाचे वर्ग ३ मधील - श्रेणी १ किंवा श्रेणी २ संवर्गातील कर्मच्याऱ्यांची शिफारस करावी.

३. निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कृषि उत्पन्न बाजार समितीची मुख्य बाजारपेठ ज्या तालूक्यात आहे अशा तालुक्यातील अधिकारी व कर्मचारी यांची शिफारस प्राधान्याने करावी.

४. एका कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीकरीता एका वेळी एकाच अधिकाऱ्याची निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्तीसाठी शिफारस करावी.

५. एका कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीकरीता एका सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची शिफारस करावी. मात्र अपवादात्मक परिस्थितीत एका पेक्षा अधिक सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची आवश्यकता असल्यास तसे स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शिफारस करावी.

६. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे प्रस्ताव कृषि उत्पन्न बाजार समितीची प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर व अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होण्याच्या १५ दिवस आगोदर प्राधिकरणास सादर करावेत.

७. नियतकालीक बदली, सेवानिवृत्ती किंवा मृत्यू इ. कारणास्तव यापूर्वी नियुक्त करण्यात आलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांना निवडणूक घेणे शक्य नसल्यास त्यांच्या नियुक्ती बदलाबाबतचा प्रस्ताव स्वयंस्पष्ट अभिप्रायासह जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी प्राधिकरणाकडे सादर करावा.